# राष्ट्रीय आरोग्य अभियान

# मोबईल मेडिकल युनिट

## नोटीस

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद जळगाव

T-Permit वाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) दरानुसार पुरवणे.

| अ.क्र. | जाहिरातीचे विवरण | वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता मोबाईल मेडिकल युनिट कार्यक्रमांतर्गत प्रति कि.मी. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO)च्या दरानुसार ७ व्यक्ती क्षमता वाहक असलेले वाहन लावण्याकरिता वाहनधारकांकडून T-Permit वाहन पुरविण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहे. |
|---|---|---|
| १. | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि.१४/०२/२०२४ ते दि.२३/०२/२०२४ संध्या. ४:०० वाजेपर्यंत |
| २. | अर्ज व कागदपत्र सादर करावयाचे ठिकाण | जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग जि. प. जळगाव |

## अटी व शर्ती

१) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO)च्या दरानुसार ७ व्यक्ती क्षमता वाहक असलेले वाहन लावण्याकरिता वाहनधारकांकडून T-Permit वाहन पुरविण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

२) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून प्राप्त प्रति कि.मी. दराप्रमाणेच वाहनाचे देयके अदा करण्यात येईल. वाहनधारकाला इंधन व चालक पुरवावयाचे आहे.

३) वाहन ६+१ क्षमता वाहक असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरूपातील व Engine Capacity १००० CC च्या वर असेन आवश्यक आहे.

४) वाहन हे ७ वर्ष कालावधीपेक्षा अधिक जुने नसावे.

५) वाहन T-Permit असने बंधनकारक असून RTO कडील सर्व परवाने व वाहनाचा पूर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.

६) नवीनतम व कमी चाललेल्या वाहनांना प्राधान्य देण्यात येईल.

७) अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा शिथील करण्यासंबंधीचे सर्व अधिकार जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जळगाव यांनी राखून ठेवण्यात येतील.

८) सदर वाहन हे शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत चालू ठेवण्यात येईल

९) वाहन दुरुस्ती, चालक खर्च व टोल खर्च वाहन मालकास द्यावा लागेल.

१०) वाहनाचा वापर ग्रामीण व डोंगराळ व दुर्गम अति-दुर्गम भागात करण्यात येईल.

११) किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एका दिवसात व मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती तीन दिवसात करून देणे बंधनकारक राहील.

१२) सदरील वाहनाकरीता स्वतंत्र लॉगबुक असणे बंधनकारक राहील.

१३) वाहन खाजगीकामाकरिता किंवा दुरुस्तीसाठी फिरविल्यास होणारी धावसंख्या कामकाजाच्या धाव संख्येत समाविष्ट करण्यात येणार नाही.

१४) वाहन धारकाने वाहन लावण्यापूर्वी वाहनाची तांत्रिक तपासणी करण्यात येईल.

१५) वाहन धारकास वाहन रद्द करावयाचे असल्यास मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जळगाव यांना एक महिना पूर्वसूचना देणे बंधनकारक राहील.

१६) वाहनास कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहनधारक यांची राहील. यासाठी रा.आ.अभियानांतर्गत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही.

१७) प्रत्येक महिन्यात वाहने फिरस्ती केल्याबाबतची नोंद लोग बुक मध्ये घेयून त्याची सत्य प्रत वर मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी ने प्रमाणीत करून सादर करण्यात यावे त्यानंतरच भाडे अदा करण्यात येईल

१८) वाहन धारकास यास कंत्राट मिळाल्यास देण्यात आलेल्या अटी व शर्ती नुसार १०० रु. च्या स्टम्प पेपर वर नोटरी सह अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरी सह सादर करण्यात यावा.

१९) भाड्याने वाहन घेण्याच्या प्रस्तावित अटी मध्ये पूर्णतः अथवा अंशता बदल करण्याचे अधिकार मा. मु.का.अ. जि. प. जळगाव व मा. जि. आ.अ. जि. प. जळगाव यांना राखीव राहील.

२०) भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनावर संदेश व स्टिकर लावण्यात येतील.

**<u>अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्र :-</u>**

१) अर्जदाराचा RTO दराप्रमाणे वाहन पुरवठा करण्यास तयार असल्याचा व नोटीस मधील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचा विनंती अर्ज

२) RC बुक ची छायांकित प्रत

३) प्रदूषण प्रमाणपत्र

४) विमा नुतनीकरण

५) प्रवासी वाहतुकीचा परवाना

६) फिटनेस प्रमाणपत्र

७) वाहन चालकाचे लायसन्स

वरील प्रमाणे अटी व शर्तीनुसार तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्रति कि.मी. च्या मंजूर दरानुसार वाहनधारकास वाहन लावण्यास इच्छुक असल्यास वरीलप्रमाणे दिलेल्य कालावधीत जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जळगाव. या कार्यालयास दिलेल्या तारखेच्या व वेळेच्या आत अर्ज कागदपत्रासह सादर करावे.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद जळगाव.**